लोकपत्र दि. 29.10.25

# माहूर पोलिसांनी अवैध रेती तस्करी करणारा ट्रॅक्टर पकडला

## महसूल प्रशासनाच्या डोळ्यात धुळफेक करत रात्रंदिवस वाळू तस्करी सुरुच



**माहूर/श.प्रतिनिधी**

माहूर ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश कराड,सपोनी शरद घोडके हे आपल्या सहकाऱ्यांसह गस्तीवर असताना माहूर तालुक्यातील मोजे पारोळा ते मांडवा अंजनखेड रस्त्यावर दिनांक २६ ऑक्टोंबर २०२५ रोजी रात्री ९ वाजताचे दरम्यान अवैधरित्या रेती तस्करी करणारा ट्रॅक्टर ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात जमा केला असुन महसूल प्रशासनाच्या डोळ्यात धुळफेक करत रात्रीच्या वेळी होत असलेल्या वाळु तस्करिला आळा घालण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, यांनी तपासणी पथक नियुक्त करावे अशी मागणी सुज्ञ नागरीकां मधुन केली जात आहे.

माहूर तालुक्याला वळसा घालून वाहत असलेल्या पैनगंगा नदी पात्रात प्रचंड वाळू साठा उपलब्ध असुन शासनाकडून ९ वाळु घाटा पैकी एकाही वाळुघाटाचा लीलाव झाला नसल्याने तालुक्यातील वाळू तस्करांकडून रात्री बेरात्री मोठ्या प्रमाणात वाळू तस्करी होत आहे. एवढेच नव्हे तर वाळु तस्करांनी वाळु तस्करिसाठी नविन ट्रॅक्टर,टिपर मोठ्या प्रमाणात खरेदी केले असल्याचे दिसून येत आहे.माहुर पोलीसांनी आठवडाभरात वाळू तस्करी करणारे दोन ट्रॅक्टर वर कारवाई केल्यावरुन वाळू तस्कर अंधाराचा फायदा घेऊन मोठ्या प्रमाणात वाळु तस्करी करित असल्याचे सिध्द झाले आहे.

दि.२६ सप्टेंबर २०२५ रोजी पोलीस पथक गस्तीवर असताना रात्री ९वाजताचे दरम्यान पानोळा ते मांडवा रस्त्यावर अवैधरित्या वाळू वाहतूक करणारा ट्रॅक्टर आढळून आला असता सदर ट्रॅक्टर पोलीस ठाण्यात जमा केला या कारवाईत पोलीस निरीक्षक गणेश कराड,सपोनी शरद घोडके, पोउपनि संदिप अन्येबोईनवाड,पोहेकाँ लक्ष्मण मेश्राम, बालाजी राठोड,,पवन राऊत, मारुती चव्हाण, गजानन जाधव, सहभागी झाले होते.